www.ecourtsindia.com

| **रे.मु.नं.१२०८/२०२१ मधील निशाणी क्र.४०**<br>**खालील आदेश**<br>**(प्रकाश चव्हाण विरुध्द हिराबाई चव्हाण व इतर)** | MHAH140018492021 |
| --- | --- |

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी याचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुत दावा निरंतर ताकीद व अतिक्रमण क्षेत्र निश्चित होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. दाव्यामध्ये गट क्र. १४५/१ व १४५/२ यामधील क्षेत्राची मो.र.नंबर २९/२०२० मध्ये कोर्ट कमिशनर म्हणून उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी मोजणी केली असता सदर क्षेत्राच्या पूर्व–पश्चिम बाजूने ओढा व रस्ता असल्याने सदरचे क्षेत्र गटातून वजा झालेले नाही. त्यामुळे उपअधीक्षक भूमी अभिलेख यांचे निमतानदार यांनी नव्याने दावा दाखल झाल्यानंतर मोजणी केलेली नाही. तसेच, दाव्याच्या कामी वादी व वादीचे साक्षीदार मोजणीदार यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल झालेले असून त्याची प्रत प्रतिवादींना मिळालेली नाही. वादी व वादीचे साक्षीदार यांचा उलटतपास घेणेचा प्रतिवादींना मूलभूत हक्क आहे. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना उलटतपासाची संधी देणे आवश्यक आहे. सबब, वादी व वादीचे साक्षीदार मोजणीदार यांचे रेकॉर्ड व नकला प्रतिवादींना उपलब्ध करुन देवून उलटतपास घेणेची परवानगी मिळावी.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तुत अर्ज कायदेशीर नाही. दावा सन २०२३ पासून चौकशीकामी नेमलेला असून वादी यांनी त्यांचा लेखी व

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH140018492021/truecopy/order-5.pdf

www.ecourtsindia.com



मौखिक पुरावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना अनेकदा संधी देवूनही त्यांनी जाणूनबुजुन वादी व वादीचे साक्षीदार यांचा उलटतपास घेतलेला नाही. उलटपक्षी प्रतिवादी यांनी निशाणी ३० वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज मूळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याच्या हेतूने दाखल केला होता. त्या अर्जावर दि. ०७.१२.२०२४ रोजी आदेश पारित करुन तो नामंजूर केला. वादीने त्यांचा पुरावा निशाणी २८ वर पुरसिस देवून दि. १९.०१.२०२४ रोजी बंद केला. त्यामुळे प्रतिवादी यांना दाव्याच्या कामकाजाची माहिती असून देखील जाणूनबुजून खोट्या स्वरुपाचे अर्ज देत आहेत. अर्जातील कारण संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद विचारात घेतला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दि. २२.०३.२०२२ रोजी प्रस्तुत दाव्यामध्ये वकिलांमार्फत हजर झाले. त्यानंतर प्रतिवादीने मुदतीत कैफियत दाखल न केल्याने प्रतिवादींच्या वतीने निशाणी १६ वर कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता अर्ज दि. १७.०६.२०२२ रोजी दाखल करण्यात आला. सदर अर्जावर दि. १४.०६.२०२३ रोजी आदेश पारित करुन दंड रक्कम रु. २००/– आकारुन अर्ज मंजूर करण्यात आला. परंतु, त्यानंतर प्रतिवादी यांनी दि. २०.०८.२०२४ पावेतो दंडाची रक्कम न भरल्याने निशाणी १६ वरील दि. १४.०६.२०२३ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला.

५. पुढे दि. २२.०८.२०२३ रोजी वादीने निशाणी २० वर सरतपासाचे शपथपत्र

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH140018492021/truecopy/order-5.pdf

दाखल केले. त्यासोबतच प्रतिवादींकरीता शपथपत्राची नक्कल दाखल केली. त्यानंतर दि. ०६.११.२०२३ रोजी वादीतर्फे निशाणी २२ वर साक्षीसमन्स काढण्याचा अर्ज देण्यात आला. त्याप्रमाणे साक्षीसमन्स काढण्यात आले. त्यानुसार निशाणी २६ वर दि. १९.०१.२०२४ रोजी वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा सरतपास नोंदवण्यात आला. त्याच दिवशी प्रतिवादी क्र.२ यांनी निशाणी ३० वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये अर्ज दिला. सदर अर्जावर वादीने दि. २५.०४.२०२४ रोजी म्हणणे दाखल केले. त्यानंतर दि. ०५.०९.२०२४ पावेतो प्रतिवादी क्र. २ याने सदर अर्जावर युक्तिवाद केला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांच्या युक्तिवादाविना सदर अर्जावर दि. ०७.१२.२०२४ रोजी आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर दि. २७.०२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

६. वरील तारखा पाहता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दाव्यात हजर झाल्यानंतर त्यांनी मुदतीत आपली कैफियत दाखल केली नाही. त्यानंतर कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता अर्ज दिला परंतु, त्या अर्जावर आदेश पारित केल्यानंतर पुरेशी संधी देवून देखील आदेशाप्रमाणे पुर्तता केली नाही. वादीने सरतपासाच्या शपथपत्रासोबत प्रतिवादींसाठी नक्कल दिलेली असताना देखील ती नक्कल स्वीकारली नाही व वादीचा उलटतपास घेतला नाही. त्यानंतर ज्या तारखेला वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा सरतपास नोंदवण्यात आला त्याच तारखेला प्रतिवादी क्र. २ च्या वतीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये अर्ज दाखल केला होता म्हणजेच त्या दिवशी प्रतिवादी क्र. २ व त्यांचे विधिज्ञ हे दाव्याकामी हजर होते. परंतु, त्यादिवशी त्यांनी

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH140018492021/truecopy/order-5.pdf

www.ecourtsindia.com



वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचा उलटतपास घेतला नाही. अशा प्रकारे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये वेळोवेळी प्रकरण लांबवल्याचे दिसून येते.

७. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये वादीच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राची प्रत मिळालेली नाही असे नमूद केले आहे. परंतु, अभिलेखावरुन असे दिसते की, वादीने प्रतिज्ञापत्राची प्रत त्याच दिवशी अभिलेखावर दाखल केलेली होती. परंतु, प्रतिवादींने ती प्रत स्वीकारली नाही. तसेच वादीतर्फे साक्षीदार क्र.२ याचा ज्या तारखेला सरतपास नोंदवला त्या तारखेस प्रतिवादी क्र.२ व त्याचे वकील हे न्यायालयात हजर होते ही बाब त्यांनी निशाणी ३० वर दाखल केलेल्या अर्जावरुन दिसून येते. परंतु, त्या दिवशी प्रतिवादींच्या वतीने वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास घेणेकरीता मुदतीचा अर्ज दिलेला नाही किंवा उलटतपास देखील घेतलेला नाही. याचाच अर्थ प्रतिवादी यांना वादीने दिलेला सरतपास व वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचा घेतलेला सरतपास याची माहिती असताना देखील प्रतिवादींने त्यांचा उलटतपास घेतलेला नाही.

८. प्रतिवादींविरुध्द दि. ०६.१०.२०२३ व दि. १९.०१.२०२४ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित केलेला आहे. परंतु, प्रस्तुत अर्ज दि. २७.०२.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. म्हणजेच उलटतपास नाही असा आदेश पारित केल्यानंतर साधारण एक वर्षाच्या विलंबाने प्रतिवादींने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादींने प्रस्तुत अर्जामध्ये झालेल्या प्रत्येक दिवसाच्या विलंबाचे कारण स्पष्ट करणे आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादींने प्रस्तुत अर्जामध्ये पुरेशी संधी देवून देखील उलटतपास का

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH140018492021/truecopy/order-5.pdf

घेतला नाही याचे कोणतेच कारण नमूद केलेले नाही. अशा प्रकारे सदरचा अर्ज हा कोणत्याही कारणाशिवाय दाखल केलेला आहे.

९. परंतु, असे असले तरी देखील प्रस्तुत वाद हा दिवाणी स्वरुपाचा आहे, त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हितसंबंध गुंतलेले आहेत. दाव्याचा पूर्णतः गुणदोषावर निकाल देणेसाठी दोन्ही पक्षांना पुरेशी संधी देणे गरजेचे आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करुन प्रतिवादी यांना एक संधी देणे योग्य ठरेल. त्याचबरोबर वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादींने वेळोवेळी दाव्याच्या कामकाजाकामी केलेला विलंब विचारात घेता सदरचा अर्ज जास्तीत जास्त दंड आकारुन मंजूर करणे योग्य व रास्त ठरेल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द झालेला निशाणी २० व निशाणी २६ वरील उलटतपास नाही हा आदेश दंड रक्कम रुपये १,०००/– भरण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीस सदर दंडाची रक्कम पुढील तारीख किंवा तत्पूर्वी दयावी.

३. वादी क्र. २ यांनी पुढील तारखेस उलटतपासाकामी न्यायालयात हजर राहावे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वरील आदेशाप्रमाणे पुर्तता करुन वादीचा उलटतपास पुढील तारखेस न घेतल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात यावा.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH140018492021/truecopy/order-5.pdf

५. उभय पक्षकारांनी प्रस्तुत आदेशाची तात्काळ नोंद घ्यावी.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.04.29 17:19:11 +0530

(**संध्या यु. सुळ**)

ठिकाण– नेवासा

दिनांक २९/०४/२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH140018492021/truecopy/order-5.pdf